सकाळ TODAY

शनिवार, ५ सप्टेंबर २०२०

# कोरोना योद्ध्यांना 'रसमाधववटी'

**पुणे :** महापालिकेच्या वीस हजार कोरोना योद्ध्यांना प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी रसमाधववटीचे वाटप करण्यात आले. या वेळी महापौर मुरलीधर मोहोळ उपस्थित होते. आनंदनाथ महाराज सांगवडेकर यांच्या आशीर्वादाने आणि राजवैद्य समीर जमदग्नि यांच्या मार्गदर्शनाने चालविण्यात येत असलेल्या 'चला भारत सशक्त करूया' मोहिमेअंतर्गत हे अभियान चालविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. कोल्हापूर येथील श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर आणि क्विकहिल फाउंडेशनच्या वतीने सफाई कर्मचारी, वार्ड अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना रसमाधव वटीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला वैद्य तुषार सौंदाणकर, वैद्य राहुल शेलार, अजय शिर्के, वैद्य श्रीकांत काकडे, वैद्य गिरीश शिर्के, वैद्य अभय जमदग्नी, वैद्य विनय सचदेव आदी उपस्थित होते.